E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# 'लिंगायत साहित्यातील परिवर्तनवादी दृष्टीकोन आणि नैतिक शिकवण'

**डॉ. लक्ष्मण गादगे**

मत्स्योदरी महाविद्यालय, अंबड.

**प्रास्ताविक :**

16 व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात मराठी लिंगायत साहित्य निर्मितीस सुरूवात झाली असे म्हणता येईल. मराठीतील लिंगायत वाङ्मय अनुवादग्रंथ, टीकाग्रंथ, स्वतंत्र चरित्र ग्रंथ, अभंग रचना आणि स्फुटरचना इत्यादी प्रकारात आढळते. शिखर शिंगणापूरच्या श्री शांतलिंग स्वामींनी ( 1504 - 1575 ) षट्स्थल चक्रवर्ती चेन्नबसवण्णांच्या' करणहसिगे 'या कन्नड ग्रंथाचा मराठी अनुवाद ' करणहंस 'या नावाने केला. शांतसंप्रदायाच्या निजगुण शिवयोगींचा ' विवेक चिंतामणी ' हा ग्रंथही त्यांनी मराठीत अनुवाद केला. श्री शांतलिंग स्वामींच्या संदर्भात महान संशोधक डॉ. एम. एम. कलबुर्गी यांनी अत्यंत महत्वपूर्ण निष्कर्ष नोंदविला आहे.तो असा - 'चतुराचार्य या कृत्रिम व्यवस्थेद्वारे कर्नाटकात शांतसंप्रदायाच्या लिंगायतांना हाताशी धरून आराध्य वीरशैवांनी तिकडे महाराष्ट्रातही तोच (लिंगायतांच्या वीरशैवीकरणाचा ) उपक्रम आरंभिला.

16 व्या शतकात शांत संप्रदायातील लिंगायतांचे वीरशैवीकरण होण्यास सुरूवात झाली. या प्रक्रियेस शिखर शिंगणापूर मठातील शांतलिंग स्वामी यांच्यामुळे अधिक गती प्राप्त झाली. डॉ. कलबुर्गींच्या या निष्कर्षातून प्रकर्षाने जाणवणारी बाब म्हणजे, लिंगायतांच्या वीरशैवीकरणाच्या प्रक्रियेची सुरूवात होय. म्हणूनच मराठी लिंगायत संत परंपरेवर वीरशैवीकरणाचा प्रभाव वाढत गेलेला दिसून येतो. ही गोष्ट आपण आवर्जून लक्षात घेतली पाहिजे. याच कालावधीत महाराष्ट्रात संत वारकरी संप्रदाय वैदिकाचा साज लेवून परधर्मियांना आकर्षित करीत होता. अशा वेळी मराठीकरण झालेले लिंगायतही स्वधर्माचरण विसरून त्या संप्रदायाकडे ओढले जात होते.अशा प्रसंगी संत मन्मथ स्वामींनी बसवादी शरणांच्या लिंगायत धर्म - संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यासाठी मराठी भाषेत साहित्य रचना आरंभिली.संत मन्मथ स्वामींनी अभंग रचना, ओवी रचना करून प्रबोधनासाठी कीर्तन परंपराही चालविली.म्हणूनच मराठी लिंगायत संत परंपरेत मन्मथ स्वामी ( 1560 - 1631 ) हे पहिले अभंगकार ठरतात.

16 व्या शतकात संत मन्मथ स्वामींपासून सुरू झालेली मराठी लिंगायत संत साहित्य परंपरा अनेक संत कवीनी समृध्द केली आहे.या मराठी लिंगायत संत परंपरेवर बसवादी शरणांच्या वचन साहित्यातील मूल्यांचा गाढ प्रभाव जाणवतो. वचन साहित्यच मराठी लिंगायत संत साहित्याची गंगोत्री

असल्याचे दिसून येते. ही साहित्य गंगोत्री विस्तारण्यात शिवलिंग, लिंगेश्वर (1604 - 1665 ), शिवदास (1608 - 1668 ), बसवलिंग (1613 - 1693 ), लक्ष्मण महाराज (1808 - 1879 ), गंगाधर स्वामी (1827 - 1909 ), महादेव प्रभू ( 1824 - 1898 ), शंकरमृगेंद्र स्वामी ( 1835 - 1921 ), विरूपाक्षप्पा शेटे (1870 - 1941 ), शिवगुरूदास ( 1873 - 1943 ), गुरुदास साकोळकर ( 879 - 1943 ), बसव दास (1886 - 1924 ), भावंडीबाई ( 1888 ), नानाजी पेंटय्या उर्फ पंचाक्षरी (1869 - 1933 ) इत्यादी मराठी संतांचे योगदान अमूल्य आहे.या संत मांदियाळीने प्रतिपादन केलेल्या पुरोगामी विचारांचा आढावा खालील काही मुद्द्यांच्या सहाय्याने घेता येईल.

**सत्य धरा हो जीवाशी :-**

संत परंपरेने नेहमीच सत्याचा आग्रह धरला आहे. सत्यम् शिवम् सुंदरम् चा साक्षात अविष्कार म्हणजेच संत साहित्य आहे. संत हे सत्याचे उपासक असल्यामुळे, त्यानी सत्याशी कधीही प्रतारणा केली नाही. उलट सत्याच्या रक्षणासाठी संतानी वाटेल ती किमत मोजली आहे.सत्य हे शाश्वत, चिरंतन, सुखप्रद असल्याचा अनुभव संतांना आला आणि तोच मार्ग त्यांनी सामान्य लोकांना त्यांच्या मातृभाषेत सुलभपणे सांगण्याचा प्रयत्न केला. सत्याचे महत्व सांगताना संत बसवलिंग म्हणतात,-

**'सत्य तोचि धर्म होय । असत्य हेचि कर्म आहे ॥**
**सत्य धरा हो जीवाशी । लाथ मारा असत्याशी ॥'**

सत्य हाच खरा धर्म असल्याचे संत बसवलिंगानी सांगितले आहे.म्हणूनच ' सत्य हे जीवाशी धरा आणि असत्य ते दूर सारा' असे म्हणतात.

लिंगायत संतांनी परशिव जसे सत्य आहे , तसे त्याच परशिवापासून निर्माण झालेले जगही सत्यच आहे असे म्हंटले आहे. संत लिंगेश्वरांच्या भाषेत सांगायचे झाले तर, ' लिंगेश्वर म्हणे जळ आणि तरंग। तैसे ब्रम्ह जग ऐक्य आहे ॥' ही लिंगायत संताची भूमिका वास्तविक अर्थाने पुरोगामी आहे. या भूमिकेतूनच मराठी लिंगायत संतांनी हे जग सुखी व सुंदर करण्याचा प्रयत्न केला आहे.

**या रे या रे लहानथोर । भलते याती नारीनर :-**

महात्मा बसवण्णांनी लिंगायत धर्मात ब्राम्हणांपासून अंत्यजांपर्यंत ; चांडाळ, वेश्या, वेश्यापुत्र, दासीपुत्र या सर्वांनाच मुक्त प्रवेश दिला होता. समता, स्वातंत्र्य, विश्वबंधुत्व व सामाजिक न्याय यावर विश्वास असणारा कोणीही स्त्री अथवा पुरूष इष्टलिंग दीक्षा घेऊन लिंगायत होऊ शकतो, एवढे मुक्त स्वातंत्र्य बसवण्णांनी बहाल केले होते. हाच वारसा जापणाऱ्या संत मन्मथ स्वामींनी दोन्ही बाहू पसरून 'या रे या रे लहानथोर । भलते याती नारीनर ॥ येथे साधन विस्तार । न लगे कोण्या सायासे ॥' असे

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

म्हणत समस्त मानवजातीला कवेत घेतले आहे. लहान - मोठा हा वर्ण अथवा वयातील भेद नाकारत, स्त्री - पुरूष हा लिंगभेद दूर सारून, अगदी सहजपणे कोणतेही सायास न करता तुम्ही या समतेच्या दिंडीत सहभागी व्हावे असे जाहीर आवाहनच संत मन्मथ स्वामी करतात.

## अंधश्रध्दानिर्मूलन :

अंधश्रध्देला बळी पडलेल्या व्यक्तींचे जीवन हे दु:ख, दारिद्र्य, अपकीर्ती, अपयश यांनी ग्रासते आणि तो दुबळा होतो. अंधश्रध्दांनी भयंकर प्रताप केला आहे. त्यांच्या कपिमुष्टीतून सामान्य जनतेला मुक्त करण्यासाठी शरणांनी खूप संघर्ष केला आहे. अंधश्रध्दांची निरर्थकता अत्यंत प्रभावीपणे शरणांनी पटवून दिली आहे. 'अग्नीला देव मानणाऱ्या ब्राम्हणाचे घर जळत असताना, तो मोरीचे पाणी टाकून बोंब मारतो, वंदायचे सोडून निंदा करतो, तेव्हा त्यातील देव कुठे गेला?', यज्ञच सर्वस्व मानून यज्ञयाग करताना दक्षाचा यज्ञ विध्वंस झाल्यावर देव का पळाले?', ' श्राध्दकर्म करणाऱ्या क्रूरकर्मींच्या घरी मद्य - मांस, परंतु लिंगासाठी नैवेद्य नाही.' 'नवस फेडणे म्हणजे दंड भरल्यासम, अंगावर अन्य मणिमाला, नंदीअंगठी, नागकुंडलादी भविशैवांच्या मुद्रा धारण करू नयेत.' 'दिन श्रेष्ठ म्हणून व्रत - वैकल्ये करणाऱ्या पंचमहापातक्यांचे तोंड पाहू नये." मंत्र - तंत्र, करणी, भूतबाधा, चमत्कार, बुवाबाजी व भोंदूगिरी अशा सर्व अंधश्रध्दांवर शरणांनी जोरदार प्रहार करून त्यांना गाढून टाकण्याची शिकवण दिली आहे.

जाती - जातीतील अस्पृश्यता, जनन आणि मृत्यू यावेळीचे सुतक, मुलगी उपवर झाल्यावर तिच्या मासिक पाळी काळातील विटाळ हे अज्ञानापोटी केले जाणारे अंध आचरण होय.वास्तविक या नैसर्गिक घडामोडी आहेत. त्याबद्दल सुतक पाळणे, भविष्य - पंचांग बघायला जाणे, भूत, पिशाच्य, राक्षस यांवर विश्वास ठेवणे या सर्व अंधश्रध्दाच आहेत. अशा अंधश्रध्दा गाढून टाकल्याशिवाय समाज सुखी व भयमुक्त होणार नाही.

## सदाचारच स्वर्ग :

एखाद्या धर्माची अथवा संस्कृतीची ओळख ही व्यक्तीच्या किंवा समाजाच्या सदाचरणातून प्रतिबिंबित होत असते. महात्मा बसवण्णांनी स्वर्ग - नरक या संकल्पना नाकारल्या आहेत. स्वर्ग कुठेतरी वर आहे, नरक कुठेतरी खाली आहे या केवळ कल्पित कथा होत. स्वर्ग - नरक, वर - खाली कुठेही नसून पृथ्वीतलावरच आहेत. देवलोक - मृत्यूलोक वेगवेगळे नसून ते आपल्याठायीच वसतात. महात्मा बसवण्णांनी तत्कालीन समाजात प्रचलित व लोकप्रिय शब्दांचा आशय बदलून अत्यंत खुबीने वापर केला आहे.

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

देवलोक - मृत्यूलोक नोहे वेगळाले,
सत्य बोलणे हाचि देवलोक,
मिथ्या बोलणे हाचि मृत्यूलोक,
सदाचार हाच स्वर्ग,
अनाचार हाच नरक,
कूडलसंगमदेवा,
यासी तुम्हीच साक्षी..!

-- महात्मा बसवण्णा

आपले सत्य बोलणे, सदाचरण हेच देवलोक, स्वर्ग निर्माण करते, तर आपले मिथ्या बोलणे, अनाचार हा नरक निर्माण करतो. आपल्या नैतिक आचरणातून पृथ्वीवरच स्वर्ग निर्माण करता येतो अशी शिकवण महात्मा बसवण्णा देतात.

**अंतरंग नि बहिरंग शुध्दी :**

व्यक्तीकल्याणासाठी अंतरंगशुध्दी पाहिजे, तर समाजकल्याणासाठी बहिरंग शुध्दी आवश्यक आहे.अंतरंग - बहिरंग शुध्दीसाठी महात्मा बसवण्णांनी सप्तशील सांगितले आहेत, ते असे -

करू नको चोरी,
करू नको हत्या,
नको रागावू कधी,
बोलू नकोस मिथ्या,
अन्यांची कधी करू नको घृणा,
नको करू कधी कोणाची मानखंडना,
करू नको आत्मप्रशंसा कधी,
हीच अंतरंगशुध्दी,
हीच बहिरंग शुध्दी,
कूडलसंगमदेवाच्या कृपाप्राप्तीची हीच रीती..!

-- महात्मा बसवण्णा

E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

बसवण्णांनी सांगितलेल्या या सात शीलांचे आचरण म्हणजे अंतरंग - बहिरंगशुध्दीचे टप्पे होत. हे सात टप्पे पार केल्यानंतर आपणास आपले प्राप्तव्य सापडते आणि मानवी जीवन पूर्णत्व पावते.

## पंचाचार : शरणांचे नीतिशास्त्र :

शरण प्रणीत लिंगायत धर्मात अष्टावरण, पंचाचार नि षट्स्थल या सैद्धांतिक संकल्पना आहेत. अष्टावरण ही सामाजिक आचार - संहिता, पंचाचार ही नैतिक आचारसंहिता आणि षट्स्थल ही तात्विक आचारसंहिता आहे. पंचाचारात लिंगाचार, सदाचार, शिवाचार, भृत्याचार आणि गणाचार या पाच आचारांचा समावेश होतो.

लिंगाचार म्हणजे, गुरूकडून प्राप्त इष्टलिंगाचीच उपासना करणे.जसे परम पतिव्रतेस एकच पती असतो, तसे परम भक्तास एकच देव असतो, ही धार्मिक नैतिकता होय. सदाचार म्हणजे, सत्य - शुध्द कायकातून संपादन केलेले धन दासोह करून व्यक्तिकल्याणासह समाजकल्याण साधणे होय. ही आर्थिक नैतिकता आहे. शिवाचार म्हणजे, सर्व मानव त्या शिवाची लेकरे आहेत असा समत्वभाव असणे होय. ही सामाजिक नैतिकता होय.

भृत्याचार म्हणजे, माझ्यापेक्षा लहान कोणी नाही, शिवभक्तापेक्षा श्रेष्ठ कोणी नाही, असा किंकर भाव होय. ही व्यक्तीगत नैतिकतेची शिकवण होय. गणाचार म्हणजे अन्यायाच्या विरूध्द अहिंसात्मक लढा देणे होय.ही सार्वभौम नैतिकतेची शिकवण होय. एकंदरीत, शरणांनी पदोपदी नैतिक व सामाजिक शिकवण दिली आहे. सकल जीवात्म्यांचे कल्याण करणे हेच शरणांच्या नैतिक शिकवणुकीचे अंतिम ध्येय होते.या ध्येयप्राप्तीसाठी आपणही शरणपथिक होऊ या !

## संदर्भ ग्रंथ :

१. जुबरे, राजू :'ज्ञानदीप लावू जगी', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान, भालकी बीदर.
२. सोलापुरे , राजशेखर : 'महात्मा बसवेश्वर', अरुणा प्रकाशन, लातूर.
३. कलबुर्गी, एम. एम. (संपा), जुबरे, राजू :'धीमंत सत्यशोधक कलबूर्गी', महाराष्ट्र बसव परिषद, भालकी बीदर.
४. डोणगावकर, वेदप्रकाश :'म.बसवेश्वर:तत्वज्ञान', स्वाती प्रकाशन, पूर्णा.
५. मेणसे, कृष्णा : 'श्री बसवेश्वर ते ज्ञानेश्वर एक चिंतन', लोकवाङ्मयगृह, मुंबई